भारत सरकार

विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# अफू व महसूल कायदे (प्रयुक्तिक्षेत्राचे विस्तारण) अधिनियम, १९५०

(सन १९५० चा अधिनियम क्रमांक ३३)

[दिनांक ३१ जानेवारी २००२ रोजी यथाविद्यमान]

# The Opium and Revenue Laws (Extension of Application) Act, 1950

**(Act No. 33 of 1950)**

**[ As in force on the 31st January, 2002]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

[ किंमत : रु. ४.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान असलेला दि ओपिअम अँन्ड रेव्हेन्यू लॉज (एक्सटेन्शन ऑफ ॲप्लिकेशन) ॲक्ट, १९५० याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक १, दिनांक २३ जानेवारी, २००३ यात पृष्ठ २४ ते २७ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २३ जानेवारी, २००३.

**सुभाष सी. जैन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Opium and Revenue Laws (Extension of Application) Act, 1950 as on the 31st January, 2002 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 12, dated 23rd January, 2003 on pages 24 to 27.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 23rd January, 2003.

SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

एच ४१३७—१ (१०३५-१-२००४)

# अफू व महसूल कायदे (प्रयुक्तिक्षेत्राचे विस्तारण) अधिनियम, १९५०

## कलमांचा क्रम

**कलमे**

१. संक्षिप्त नाव.

२. भारताच्या विवक्षित भागांवर विवक्षित अफू व महसूल कायद्यांचा विस्तार करणे.

३. आयकर अन्वेषणासंबंधीच्या राज्य कायद्यात बदल.

४. निरसने व व्यावृत्ती.

५. अडचणी दूर करणे.

**अनुसूची.**

# अफू व महसूल कायदे (प्रयुक्तिक्षेत्राचे विस्तारण) अधिनियम, १९५०

(१९५० चा अधिनियम क्रमांक ३३)

(३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान)

[१८ एप्रिल, १९५०]

**भारताच्या विवक्षित भागांवर विवक्षित अफू व महसूल कायद्यांचा विस्तार करण्याचा उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

१. या अधिनियमास, 'अफू व महसूल कायदे (प्रयुक्तिक्षेत्राचे विस्तारण) अधिनियम, १९५०' संक्षिप्त नाव असे म्हणावे.

भारताच्या विवक्षित भागांवर विवक्षित अफू व महसूल कायद्यांचा विस्तार करणे.

२. (१) पुढील अधिनियम, म्हणजेच—

(एक) 'अफू अधिनियम, १८५७' (१८५७ चा तेरा),

(दोन) 'अफू अधिनियम, १८७८' (१८७८ चा एक),

(तीन) 'महसूल वसुली अधिनियम, १८९०' (१८९० चा एक),

(चार) 'सरकारी व्यापार कराधान अधिनियम, १९२६' (१९२६ चा दोन),

(पाच) 'घातक औषधिद्रव्ये अधिनियम, १९३०' (१९३० चा दोन),

(सहा) 'प्राप्तीवरील कराधान (अन्वेषण आयोग) अधिनियम, १९४७' (१९४७ चा तीस), व

(सात) 'करभरणा (संपत्ती हस्तांतरण) अधिनियम, १९४९' (१९४९ चा बावीस) आणि त्याखाली करण्यात आलेले जे सर्व नियम व आदेश या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी भारताच्या विवक्षित भागांमध्ये अंमलात होते ते सर्व याद्वारे जम्मू आणि काश्मीर राज्य खेरीज करून, उर्वरित भारतावर विस्तारित करण्यात येत आहेत आणि तेथे ते अंमलात राहतील.

(२) अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेली विशोधने पूर्वोक्त अधिनियमात करण्यात येतील.

३. जर या अधिनियमाच्या प्रारंभ होण्याच्या निकटपूर्वी, 'प्राप्तीवरील कराधान (अन्वेषण आयोग) आयकर अन्वेषणा-अधिनियम, १९४७' (१९४७ चा तीस) याच्याशी समनुरूप असलेला कोणताही कायदा (यात यापुढे संबंधीच्या राज्य 'राज्य कायदा' म्हणून निर्दिष्ट) जम्मू आणि काश्मीर राज्य खेरीज करून अन्य कोणत्याही भाग ख राज्यात कायद्यात बदल. अंमलात असेल तर, तो कायदा खालील बदलांसह तसाच अंमलात राहील, ते बदल असे :—

(क) कृषि-उत्पन्नाखेरीज इतर प्राप्तीवरील कराधानाशी संबंधित असलेल्या बाबींसंबंधी राज्य आयोगाकडे (मग त्यास कोणत्याही नावाने संबोधलेले असो) सोपवण्यात आलेली किंवा त्याच्याकडे प्रलंबित असलेली सर्व प्रकरणे निकालासाठी केंद्रीय आयोगाकडे वर्ग होतील :

परंतु, या कलमाच्या उपबंधानुसार कोणतेही प्रकरण वर्ग झाले एवढ्याच कारणामुळे केंद्रीय आयोग, एखाद्या प्रकरणात ज्याने पूर्वी साक्ष दिली असेल अशा कोणत्याही साक्षीदारास पुन्हा बोलावण्यास किंवा त्याची साक्ष पुन्हा ऐकण्यास बांधलेला असणार नाही, आणि मुळात जो आयोग या प्रकरणाचे अन्वेषण करत होता त्याने पूर्वीच नोंदलेल्या किंवा त्याच्यापुढे हजर करण्यात आलेल्या साक्षीपुराव्याच्या आधारावर तो कार्य करू शकेल ;

¹[(ख) खंड (क) खाली केंद्रीय आयोगाकडे वर्ग झालेल्या प्रकरणांचा निकाल काढताना त्यास 'प्राप्तीवरील कराधान (अन्वेषण आयोग) अधिनियम, १९४७' (१९४७ चा तीस) याखाली त्याच्याकडे सोपवण्यात आलेल्या प्रकरणांच्या अन्वेषणासाठी त्याला ज्या शक्ती आहेत आणि ज्यांचा तो वापर करतो, त्याच शक्ती असतील व त्यांचा तो वापर करील, आणि त्या अधिनियमाच्या कलम ४ च्या पोटकलम (३) खाली नेमून दिली आहे तितक्या मुदतीपुरते कार्य करण्याचा त्याला हक्क असेल;

(खख) त्रावणकोरच्या किंवा त्रावणकोर-कोचीनच्या मुख्य महसूल प्राधिकरणाने त्या संस्थानात त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीद्वारे त्यास प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही शक्तींचा वापर करून किंवा तसा वापर करतो असे म्हणून दिलेला कोणताही निर्णय हा प्राप्तिकर प्राधिकरणाने दिलेला निर्णय आहे असे 'त्रावणकोर कराधान (अन्वेषण आयोग) अधिनियम, १९२४' (त्रावणकोर अधिनियम, १९२४ चा चौदा), कलम ८, पोटकलम (२) च्या प्रयोजनापुरते मानले जाईल.];

---

१. १९५१ चा अधिनियम ४४, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घातला.

(ग) राज्य शासनाचा किंवा राज्य आयोगाचा राज्य विधीतील निर्देश कोणत्याही प्रकारच्या शब्दांनी केलेला असो, कृषि-उत्पन्नाखेरीज अन्य प्राप्तीच्या बाबतीत त्या निर्देशाचा अर्थ, केंद्र सरकारचा किंवा, प्रकरणपरत्वे, केंद्रीय आयोगाचा निर्देश म्हणून लावला जाईल;

(घ) केंद्रीय आयोगाचे प्रतिवेदन केंद्र सरकारला सादर केले जाईल, आणि ते प्रतिवेदन ज्या व्यक्तीच्या प्रकरणाशी संबद्ध असेल तिच्या कृषि-उत्पन्नाहून अन्य प्राप्तीच्या बाबतीत तिच्या-विरुद्ध, प्राप्तीकर, अधिकर, अतिलाभ कर यासंबंधी त्या राज्यात अंमलात असलेल्या कायद्याखाली किंवा इतर कोणत्याही कायद्याखाली केंद्र सरकारला योग्य वाटेल अशी कार्यवाही करण्यात यावी असे केंद्र सरकार लेखी आदेशाद्वारे निदेशित करू शकेल, आणि असा निदेश दिला असताना, त्या राज्यात लागू असलेल्या समुचित कायद्याखाली अशी सर्व कार्यवाही, जणू काही त्याच कायद्याअन्वये असा निदेश देण्यात येऊन ती कार्यवाही सुरू केलेली असावी त्याप्रमाणे, सुरू करून ती पूर्ण करता येईल ;

(ङ) जेथे राज्यात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली निर्धारितीने द्यावयाचा कर निश्चित करण्यासाठी त्याचे कृषि-उत्पन्न त्याच्या एकूण प्राप्तीमध्ये समाविष्ट करावयाचे असेल तेथे, त्याच्या कृषि-उत्पन्नाहून इतर प्राप्तीवर भरावयाचा कर म्हणजे, अशा प्राप्तीचे कृषि-उत्पन्नासहित एकूण प्राप्तीशी जे प्रमाण असेल त्याच प्रमाणात जी रक्कम, संयुक्त निर्धारण झाले असते तर राज्यात अंमलात असलेल्या समुचित कायद्यान्वये जो भरावा लागला असता त्या कराच्या रकमेशी प्रमाणशीर होईल, ती रक्कम असेल :

परंतु, त्या राज्यात अंमलात असलेल्या समुचित कायद्यानुसार कृषि उत्पन्नावरील करात कोणतीही कपात करण्यात आली असेल तर ती या प्रयोजनापुरती हिशेबात धरली जाणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमामध्ये, "केंद्रीय आयोग" याचा अर्थ, 'प्राप्तीवरील कराधान (अन्वेषण आयोग) अधिनियम, १९४७' (१९४७ चा तीस) याखाली नेमलेला प्राप्तिकर अन्वेषण आयोग, असा आहे.

**निरसने व व्यावृत्ती.** ४. या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी जर जम्मू आणि काश्मीर राज्यांखेरीज अन्य कोणत्याही भाग ख राज्यात किंवा कूच बिहार या विलीन राज्यक्षेत्रात, कलम २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी 'प्राप्तीवरील कराधान (अन्वेषण आयोग) अधिनियम, १९४७' (१९४७ चा तीस) याहून अन्य अशा कोणत्याही अधिनियमाशी समनुरूप असलेला कोणताही कायदा अंमलात असेल तर, तो कायदा या अधिनियमाचा प्रारंभ होताच निरसित होईल :

परंतु, अशा निरसनामुळे—

(क) त्या कायद्याचे पूर्व प्रवर्तन, अथवा

(ख) त्या कायद्याविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल झालेली कोणतीही शास्ती, समपहरण किंवा शिक्षा, अथवा

(ग) अशा कोणत्याही शास्तीच्या, समपहरणाच्या किंवा शिक्षेच्या बाबतचे कोणतेही अन्वेषण, वैध कार्यवाही किंवा उपाय यावर परिणाम होणार नाही, आणि जणू काही हा अधिनियम पारित करण्यात आलेला नसावा त्याप्रमाणे असे कोणतेही अन्वेषण किंवा वैध कार्यवाही सुरू करता येईल किंवा चालू ठेवता येईल किंवा उपाय योजता येतील आणि अशी कोणतीही शास्ती, समपहरण किंवा शिक्षा लादता येईल :

परंतु आणखी असे की, त्या कायद्याच्या कोणत्याही उपबंधाखाली केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ती केंद्रीय अधिनियम आता त्या राज्यावर जसा विस्तारित करण्यात आला आहे तशा स्वरूपातील त्या अधिनियमाच्या समनुरूप उपबंधाखाली करण्यात आली असल्याचे मानले जाईल आणि तदनुसार तिचा अंमल चालू राहील.

**अडचणी दूर करणे.** ५. भारताच्या एखाद्या भागात या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी अंमलात नसलेले जे अधिनियम, नियम किंवा आदेश आता विस्तारित करण्यात आले आहेत, त्यांपैकी कशाच्याही उपबंधांची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण निर्माण झाली तर, ती अडचण दूर करण्यासाठी केंद्र सरकार शासकीय राजपत्रात आदेश प्रसिद्ध करून, त्यास योग्य वाटेल अशी तरतूद करू शकेल किंवा तसा निदेश देऊ शकेल.

अनुसूची

[कलम २ (२) पहा]

**विशोधित अधिनियमिती**

| वर्ष<br>(१) | क्रमांक<br>(२) | संक्षिप्त नाव<br>(३) | विशोधने<br>(४) |
|---|---|---|---|
| १८५७ | तेरा | अफू अधिनियम, १८५७. | (१) प्रास्ताविकातील 'बंगालमधील फोर्ट विल्यम या इलाख्यातील' हे शब्द वगळावे.<br>(२) खालील मजकूर कलम १ म्हणून समाविष्ट करावा :—<br>"१. संक्षिप्त नाव व विस्तार :—<br>(१) या अधिनियमास 'अफू अधिनियम, १८५७' असे म्हणता येईल.<br>(२) जम्मू आणि काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतावर त्याचा विस्तार आहे.". |
| १८७८ | एक | अफू अधिनियम, १८७८. | (१) कलम १ मधील दुसऱ्या व तिसऱ्या परिच्छेदाऐवजी खालील मजकूर घालावा :—<br>"जम्मू आणि काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतावर त्याचा विस्तार आहे.".<br>(२) कलम ३ मधील 'आयात', 'निर्यात', 'परिवहन', 'विक्री' व 'विक्री करणे' यांच्या व्याख्यांऐवजी पुढील मजकूर घालावा, तो असा :—<br>"सीमाशुल्क हद्दी" याचा अर्थ, 'सागरी सीमाशुल्क अधिनियम, १८७८' (१८७८ चा आठ) याच्या कलम ३ क खाली केंद्र सरकारने भारताच्या ज्या सीमाशुल्क हद्दी निश्चित केल्या असतील त्यापैकी कोणतीही हद्द, असा आहे,<br>"परिवहन" याचा अर्थ, एकाच राज्यातील एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी हलवणे, असा आहे.<br>"विक्री" यात सीमाशुल्क हद्दीपलीकडे निर्यात करण्यासाठी केलेल्या विक्रीचा समावेश नाही, व "विक्री करणे" याचा अर्थ, तदनुसार लावण्यात येईल. |
| १८९० | एक | महसूल वसुली अधिनियम, १८९०. | (१) कलम १ च्या पोटकलम (२) मधील "भाग 'ख' राज्ये" हे शब्द व अक्षर यांऐवजी "जम्मू व काश्मीर राज्य" हे शब्द घालावेत.<br>(२) कलम ४ च्या पोटकलम (४) मधील "एखादा भाग 'क' राज्यातील किंवा भाग 'ग' राज्यातील" या शब्दांऐवजी "ज्या कोणत्याही राज्यावर या अधिनियमाचा विस्तार असेल त्यातील" हे शब्द घालावेत. |
| १९२६ | तीन | सरकारी व्यापार कराधान अधिनियम, १९२६. | (१) प्रास्ताविकामधील "कोणत्याही सामील संस्थानाच्या किंवा अन्य भारतीय संस्थानाच्या" हे शब्द गाळावेत.<br>(२) कलम २ मध्ये,—<br>(क) पोटकलम (१) मध्ये "भाग 'क' राज्यांमध्ये व भाग 'ग' राज्यांमध्ये" याऐवजी "भारतात" हा शब्द घालावा.<br>(ख) पोटकलम (१क) गाळावे. |

**अनुसूची**--(पुढे चालू)

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | | | (ग) पोटकलम (३) मध्ये शेवटी पुढील शब्दांची भर घालावी, ते असे :-- "व 'भारत' याचा अर्थ, जम्मू व काश्मीर राज्य वगळून भारताचे राज्यक्षेत्र असा आहे.". (३) कलम ३ मधील "सामील संस्थानावर किंवा अन्य भारतीय संस्थानावर" याऐवजी "भाग 'ख' राज्यावर" हे शब्द व अक्षर घालावे. |
| १९३० | दोन | घातक औषधिद्रव्ये अधिनियम, १९३०. | (१) कलम १ चे पोटकलम (२) मधील "भाग 'ख' राज्ये" हे शब्द व अक्षर याऐवजी "जम्मू व काश्मीर राज्य" हे शब्द घालावेत. (२) कलम ३९ च्या पोटकलम (१) मधील "किंवा भाग 'क' राज्याच्या अगर भाग 'ग' राज्याच्या विधानमंडळाच्या अधिनियमाच्या" या शब्दांऐवजी "किंवा कोणत्याही राज्य विधानमंडळाच्या अधिनियमाच्या" हे शब्द घालावेत. |
| १९४७ | तीस | प्राप्तीवरील कराधान (अन्वेषण आयोग) अधिनियम, १९४७. | कलम १ च्या पोटकलम (२) मध्ये "भाग 'ख' राज्ये" हे शब्द व अक्षर याऐवजी "जम्मू व काश्मीर राज्य" हे शब्द घालावेत. |
| १९४९ | बावीस | कर भरणा (संपत्ती हस्तांतरण) अधिनियम, १९४९. | (१) कलम १ च्या पोटकलम (२) मधील "भाग 'ख' राज्ये" हे शब्द व अक्षर याऐवजी "जम्मू व काश्मीर राज्य" हे शब्द घालावेत. (२) कलम २ च्या स्पष्टीकरणामध्ये भाग 'ख' राज्यांच्या उल्लेखाऐवजी जम्मू व काश्मीर राज्याचा उल्लेख घालावा. |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई